**L. A. BILL No. C OF 2025.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १००.**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९६६ चा महा. ४१.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः-

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

एचबी १२७५–१

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ यामध्ये कलम २५९अ समाविष्ट करणे.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त संहिता" असा केला आहे) याच्या प्रकरण १३, मध्ये कलम २५९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल आणि ते, उक्त संहितेच्या प्रारंभापासून नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :— (१९६६ चा महा. ४१.)

अपिलाची सुनावणी करण्याचा अधिकार.

"**२५९अ.** या प्रकरणान्वये राज्य शासनासमोर दाखल केलेले अपील, पुनरीक्षण किंवा पुनर्विलोकन याची सुनावणी, महसूल विभागाच्या प्रभारी मंत्र्याकडून अथवा प्रभारी मंत्र्याने तसे यथोचितरीत्या प्राधिकृत केलेले असेल तर, महसूल विभागाच्या प्रभारी राज्यमंत्र्याकडून किंवा, अपर मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव किंवा, यथास्थिति, सचिव तथा विशेष कार्यकारी अधिकारी (अपील व पुनरीक्षण), महसूल विभाग, याच्याकडून करण्यात येईल व त्यावर निर्णय देण्यात येईल.".

विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

**३.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये किंवा त्यान्वये केलेल्या कोणत्याही नियमांमध्ये अथवा उक्त संहितेच्या तरतुदींन्वये कार्य करणाऱ्या किंवा कार्य करण्याचे अभिप्रेत असणाऱ्या कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, महसूल विभागाच्या प्रभारी मंत्र्याने किंवा प्रभारी राज्यमंत्र्याने, किंवा अपर मुख्य सचिवाने किंवा प्रधान सचिवाने किंवा सचिव तथा विशेष कार्यकारी अधिकारी (अपील व पुनरीक्षण), महसूल विभाग याने, महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२५ (यात यापुढे या कलमामध्ये ज्याचा निर्देश, "सुधारणा व विधिग्राह्यीकरण अधिनियम" असा केला आहे) याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी उक्त संहितेन्वये अपिलांमध्ये, पुनरीक्षणांमध्ये किंवा पुनर्विलोकनांमध्ये केलेली कोणतीही कारवाई किंवा केलेली गोष्ट, घेतलेले निर्णय किंवा पारित केलेले आदेश; आणि महसूल अधिकाऱ्यांनी किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने केलेली कोणतीही कारवाई, केलेली गोष्ट, घेतलेले निर्णय किंवा पारित केलेले आदेश हे, जणू काही उक्त संहितेच्या तरतुदी, सुधारणा व विधिग्राह्यीकरण अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे सर्व महत्त्वाच्या वेळी सतत अंमलात होत्या असे समजून, कायद्यानुसार, यथोचितरीत्या व वैधरीत्या केलेली कारवाई, केलेली गोष्ट, घेतलेले निर्णय किंवा पारित केलेले आदेश असल्याचे मानण्यात येतील आणि नेहमीकरिता करण्यात आलेली कारवाई, करण्यात आलेली गोष्ट, घेण्यात आलेले निर्णय किंवा पारित करण्यात आलेले निर्णय असल्याचे मानण्यात येतील, आणि त्यानुसार, अशा प्रारंभाच्या पूर्वी उक्त संहितेच्या तरतुदी, महसूल विभागाच्या प्रभारी राज्यमंत्र्याला किंवा अपर मुख्य सचिवाला किंवा प्रधान सचिवाला किंवा सचिव तथा विशेष कार्यकारी अधिकारी (अपील व पुनरीक्षण), महसूल विभाग यास, राज्य शासनासमोर दाखल केलेल्या अपिलांची, पुनरीक्षणाची किंवा पुनर्विलोकनाची सुनावणी घेण्याचा व त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता, या कारणावरून, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकरणासमोर कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. (१९६६ चा महा. ४१.) (२०२५ चा महा. .....)

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याच्या प्रकरण १३ मध्ये, उक्त संहितेन्वये, महसूल अधिकाऱ्याने किंवा भूमापन अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध व आदेशाविरुद्ध अपिले, पुनरीक्षणे व पुनर्विलोकने दाखल करण्याच्या तरतुदी अंतर्भूत आहेत. उक्त संहितेच्या कलम २४८ मध्ये, आयुक्ताने किंवा जमाबंदी आयुक्ताने किंवा भूमी अभिलेख संचालकाने दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे अपील दाखल करण्याची तरतूद आहे. उक्त संहितेच्या कलम २५७ मध्ये, कोणत्याही महसूल अधिकाऱ्याच्या किंवा भूमापन अधिकाऱ्याच्या कोणत्याही चौकशीचा किंवा कार्यवाहीचा अभिलेख मागवण्याच्या व त्यांची तपासणी करण्याच्या राज्य सरकारच्या पुनरीक्षणात्मक अधिकाराची तरतूद केली आहे. उक्त संहितेच्या कलम २५८ मध्ये, राज्य सरकारने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पुनर्विलोकन करण्याच्या राज्य सरकारच्या अधिकाराची तरतूद केली आहे.

**२.** राज्य सरकारसमोर दाखल करण्यात आलेल्या अपिलांची, पुनरीक्षणाची व पुनर्विलोकन अर्जांची मोठी संख्या विचारात घेता, महसूल मंत्र्यांनी, विवक्षित अपिले, पुनरीक्षणे किंवा पुनर्विलोकन अर्ज, प्रशासकीय सोयीसाठी त्यावर निर्णय देण्याकरिता आणि ते जलदगतीने निकालात काढण्यासाठी प्रभारी राज्यमंत्र्याकडे किंवा सचिव तथा विशेष कार्यकारी अधिकारी (अपील व पुनरीक्षण) याच्याकडे सोपविण्यासाठी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६६ अन्वये केलेल्या महाराष्ट्र शासनाच्या कामकाज नियमावलीच्या नियम १५ अन्वये दिलेल्या शासनाच्या कामकाजासंबंधीच्या अनुदेशांनुसार, वेळोवेळी, आदेश दिलेले आहेत. त्यानुसार, राज्यमंत्री किंवा सचिव, अशा प्रकरणांची सुनावणी घेतात व निर्णय देतात.

**३.** मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने, रिट याचिका क्रमांक २०२४ ची ८९७७ आणि २०२४ ची ८९७८ यामध्ये पारित केलेल्या त्याच्या दिनांक ९ मे, २०२५ रोजीच्या आदेशामध्ये असा निर्णय दिला आहे की, कामकाज नियमावली, सांविधिक तरतुदीला अधिभावी ठरू शकत नाही, म्हणून दुसरे पुनरीक्षण दाखल करण्याचा अधिकार सोपविणे हे, संहितेच्या कलम २५७ च्या पोट-कलम (४) च्या विरुद्ध असल्याने ते वैध ठरत नाही.

**४.** जमिनीच्या कायदेशीर मालकांना किंवा भोगवटादारांना दिलासा देण्याच्या आणि तसेच खटल्यांमध्ये अडकलेल्या जमिनींचा, शेती तसेच अकृषिक प्रयोजनांसाठी वापर करणे शक्य होण्याच्या दृष्टीने, शासनासमोर मोठ्या संख्येने दाखल झालेले अपिले, पुनरीक्षण व पुनर्विलोकन अर्ज, वेळेत निकालात काढणे आवश्यक आहे. म्हणून, राज्य शासनासमोर दाखल झालेली अपिले, पुनरीक्षणे किंवा पुनर्विलोकन अर्ज यांची, जर प्रभारी मंत्र्याने तसे यथोचितरीत्या प्राधिकृत केले असेल तर, महसूल विभागाच्या प्रभारी राज्यमंत्र्याकडून, किंवा यथास्थिति, सचिव तथा विशेष कार्यकारी अधिकारी (अपील व पुनरीक्षण),महसूल विभाग याच्याकडून सुनावणी करण्यात येईल व त्यावर निर्णय घेण्यात येईल अशी तरतूद, उक्त संहितेत करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

**५.** वरील प्रयोजनांकरिता, उक्त संहितेत नवीन कलम २५९अ पूर्वलक्षी प्रभावाने, समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले आहे. महसूल विभागाच्या प्रभारी राज्यमंत्र्याने किंवा सचिव तथा विशेष कार्यकारी अधिकारी (अपील व पुनरीक्षण), महसूल विभाग याने हाती घेतलेली कोणतीही कारवाई किंवा केलेल्या गोष्टी, घेतलेले निर्णय किंवा पारित केलेले आदेश यांची विधिग्राह्यता व व्यावृत्ती याकरिता तरतूद करण्याचे देखील प्रस्तावित केले आहे.

**६.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक ९ डिसेंबर २०२५.

**चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.

**महाराष्ट्र  विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १००.]**

**[ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.]

**[ विधानसभेने दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.

एचबी १२७५–२